**मुंबईतील बंद/आजारी गिरण्यांमधील गिरणी कामगारांसाठी मुंबई महानगर प्रदेश क्षेत्रामध्ये घरकुले उपलब्ध करुन देण्याबाबत...**

**महाराष्ट्र शासन**
**गृहनिर्माण विभाग**
**शासन निर्णय क्र. गिकाघ-२०२३/प्र.क्र.१२८/गृनिधो-२**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांकः १९ ऑक्टोबर, २०२६ .

वाचा :-

१) शासन निर्णय क्र. गिकाघ-२०२३/प्र.क्र.१२८/गृनिधो-२, दिनांक १५ मार्च, २०२४.
२) शासन निर्णय क्र. गिकाघ-२०२३/प्र.क्र.१२८/गृनिधो-२, दिनांक २९ डिसेंबर, २०२५

प्रस्तावना:-

सन १९८२ च्या संपामुळे बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील ५८ आजारी/ बंद पडलेल्या कापड गिरण्यांमधील पात्र गिरणी कामगार/त्यांच्या वारसांना मुंबई महानगर क्षेत्रामध्ये घरकुले उपलब्ध करुन देण्याबाबत वाचा क्र. १ येथील शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

पात्र गिरणी कामगारांना घरे मिळण्याकरिता विविध संघटना मार्फत शासनाकडे सातत्याने सुरू असलेला पाठपुरावा विचारात घेता गिरणी कामगारास मुंबई महानगर प्रदेश (MMR) क्षेत्रात घरे देण्याच्या अनुषंगाने विविध पर्यायांचा अवलंब करण्यासाठी सदर शासन निर्णयात अंशत: सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

सन १९८२ च्या संपामुळे बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील ५८ आजारी/ बंद पडलेल्या कापड गिरण्यांमधील पात्र गिरणी कामगार/त्यांच्या वारसांना मुंबई महानगर क्षेत्रामध्ये घरकुले उपलब्ध करुन देण्याकरीता वाचा क्र.१ येथील दिनांक १५ मार्च, २०२४ च्या शासन निर्णयामध्ये खालील सुधारणा करण्यात येत आहे:-

१) गिरणी कामगार/त्यांच्या वारसांना घरकुले उपलब्ध करुन देण्याकरीता प्रतिकृती क्र. २ व ३ अंतर्गत खाजगी विकासकांकडील मंजूर अभिन्यासावर घर बांधण्याकरीता ३० एकर क्षेत्राऐवजी कमीत कमी ०१ एकर इतके क्षेत्र विकासकाच्या स्वत:च्या मालकीचे अथवा त्याच्याकडे अशा क्षेत्राचे अहस्तांतरणीय कुलमुखत्यार पत्र असावे.

२) गिरणी कामगारांसाठी परवडणाऱ्या दरात घरांची निर्मिती करण्याकरीता प्रकल्पांना रहिवाशी क्षेत्रात २.५ चटई क्षेत्राऐवजी ३.०० चटई क्षेत्र, हरित/ना-विकास क्षेत्रात १.०० चटई क्षेत्र अनुज्ञेय करण्यात यावे.

३)गिरणी कामगारास तातडीने तयार घरे उपलब्ध करून देण्याकरीता मुंबई महानगर प्रदेश (MMR) मधील ज्या प्रकल्पामध्ये कमीत कमी १०० तयार घरे उपलब्ध आहेत व संबंधित जे विकासक रु.१५ लक्ष प्रति घरकुल अथवा तेथील रेडीरेकनर दर यापैकी जो दर कमी असेल त्या दराने घरे देण्यास तयार असतील त्यासाठी म्हाडा प्राधिकरणामार्फत EoI प्रसिध्द करण्यात यावेत.

२. सदरचा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला आहे. त्याचा संकेतांक २०२६१०१९१२५५३२३७०९ असा आहे. सदरचा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

PHIRANGE NITIN RAGHUNATH

Digitally signed by PHIRANGE NITIN RAGHUNATH
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOUSING DEPARTMENT,
2.5.4.20=edb67d4776bf9bdb10539891848bf113937cdf1adfca7bf1e9cac22215940c14, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=2B60EEA8BE04A132B62B97355616E6FF0326DC7DC810ECA40666D631BE1ACA07, cn=PHIRANGE NITIN RAGHUNATH
Date: 2026.10.19 12:57:01 +05'30'

**(नितीन फिरंगे)**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.**

**प्रत:-**

१. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई .
२. मा. राज्यपालांचे प्रधान सचिव, राजभवन, (पत्राने)
३. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. अपर मुख्य सचिव, महसूल, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. प्रधान सचिव, (व्यय), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
७. प्रधान सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
८. प्रधान सचिव(नवि-२), नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. प्रधान सचिव (नवि-१) नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०. प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई.
११. प्रधान सचिव, कामगार, उद्योग उर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई
१२. प्रधान सचिव, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३. उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई.
१४. सर्व विभागीय आयुक्त,

१५. सर्व जिल्हाधिकारी,
१६. महालेखापाल, महाराष्ट्र -१/२ )लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता .(मुंबई/नागपूर).
१७. व्यवस्थापकिय संचालक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी ,महाहौसिंग ,३रा मजला ,साखर भवन ,नरीमन पॉईंट ,मुंबई - २१.
१८. मुख्याधिकारी ,राज्यस्तरीय प्रकल्प व्यवस्थापन यंत्रणा (Project Management Unit (PMU) ३ रा मजला, मंत्रालय, मुंबई - ३२.
१९. मा. मंत्री, गृहनिर्माण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय मुंबई.
२०. मा. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा, म.वि.स.,यांचे खाजगी सचिव विधानभवन, मुंबई.
२१. मा. विरोधी पक्षनेता,महाराष्ट्र विधानपरिषद,म.वि.स.,यांचे खाजगी सचिव विधानभवन,मुंबई.
२२. संबंधित कोषागार अधिकारी.
२३. अपर मुख्य सचिव (गृहनिर्माण) यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.
२४. निवडनस्ती/ गृनिधो-२ कार्यासन, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय,मुंबई-३२.